यशवंतराव चव्हाण सेंटर

विश्वासार्ह सर्वोत्तम सेवा



# यशवंतराव चव्हाण राज्यस्तरीय पारितोषिक पुरस्काराच्या अटी व शर्ती

आधुनिक महाराष्ट्राचे शिल्पकार स्व. यशवंतराव चव्हाण यांच्या नावे दरवर्षी यशवंतराव चव्हाण सेंटरच्या वतीने यशवंतराव चव्हाण राज्यस्तरीय पारितोषिक पुरस्कार दिला जातो.

१. कृषी औद्योगिक समाज रचना / व्यवस्थापन प्रशासन

२. सामाजिक एकात्मता / विज्ञान – तंत्रज्ञान

३. ग्रामीण विकास / आर्थिक – सामाजिक विकास

४. मराठी साहित्य संस्कृती / कला-क्रीडा

महाराष्ट्रात दरवर्षी वरील क्षेत्रात असाधारण व भरीव कामगिरी करणाऱ्या एका व्यक्तीस किंवा संस्थेस हा पुरस्कार देण्याचा निर्णय चव्हाण सेंटरने घेतला आहे. रुपये २ लाख व सन्मानपत्र असे या पुरस्काराचे स्वरुप आहे.

## पुरस्काराची पात्रता :

- ‘संस्था’ या संज्ञेखाली महाराष्ट्रातील सार्वजनिक विश्वस्त संस्था नोंदणी अधिनियम, सहकारी कायदा किंवा कंपनी कायद्याखाली नोंदणी झालेल्या संस्था यांचा समावेश होईल.
- ज्या क्षेत्रातील पारितोषिकासाठी प्रस्ताव करण्यात आला असेल, त्या क्षेत्रात किमान सलग पाच वर्ष काम असणे आवश्यक आहे.
- निवड मंडळाने एकमताने वा बहुमताने निवडलेल्या व्यक्तीस किंवा संस्थेस पारितोषिक व सन्मानपत्र दिले जाईल.
- निवड मंडळास एखाद्या वर्षी संबधित क्षेत्रात योग्य व्यक्ति किंवा संस्था पारितोषिकास पात्र वाटली नाही तर त्यावर्षी पारितोषिक दिले जाणार नाही.
- पारितोषिकासाठी निवड झालेल्या व्यक्तीस किंवा संस्थेस पुन्हा पाच वर्षापर्यंत त्याच क्षेत्रातील कामाच्या पारितोषिकासाठी विचारात घेतले जाणार नाही.
- निवड मंडळाचा निर्णय अंतिम राहील.

## निवड मंडळ :

- पारितोषिकासाठी स्वतः इच्छूक व्यक्ती वा त्यांच्या संस्थेने केलेला अर्ज विचारात घेतला जाणार नाही.
- आमदार, खासदार, महानगरपालिका महापौर, जिल्हा परिषद अध्यक्ष, राज्यस्तरीय सहकारी व स्वयंसेवी संस्थेचे पदधिकारी, व्यापारी औद्योगिक संस्थांचे अध्यक्ष, विद्यापीठाचे उपकुलगुरु त्याचप्रमाणे नामवंत साहित्यिक, प्रमुख सामाजिक कार्यकर्ते, कलावंत यांना पारितोषिकासाठी योग्य व्यक्ति किंवा संस्थांची शिफारस करून प्रस्ताव पाठवता येईल.
- पारितोषिकासाठी ज्या व्यक्तीची वा संस्थेची शिफारस करावयाची आहे, त्यांची संपूर्ण माहिती खालील मार्गदर्शक सूचनांप्रमाणे मराठीत पाठवावी.
- सोबत पाठविलेले फोटो, दाखले, लिखाण किंवा इतर साहित्य परत करणे शक्य होणार नाही. परंतु त्याबाबतीत निवडमंडळाने मागितल्यास वरील कागदपत्रांच्या मूळ प्रति सेंटरकडे सादर कराव्या लागतील. अशा मूळ प्रति पारितोषिक वितरणानंतर परत केल्या जातील.
- पुरस्काराची घोषणा झाल्यानंतर किंवा प्रस्तावात जाहिर केलेल्या अंतिम तारखेपूर्वी सेंटरच्या मुंबई कार्यालयात कागदपत्रांची मूळ प्रत प्राप्त होणे आवश्यक आहे.

- चव्हाण सेंटरची कार्यकारी समिती या पारितोषिकासाठी निवड मंडळ म्हणून काम करतील.
- वरील शिफारशी किंवा प्रस्तावांशिवाय इतर योग्य व्यक्ति वा संस्था निवडण्याचा अधिकार कार्यकारी समितीस राहील.

## मार्गदर्शक सुचना :

- ज्या व्यक्तीची शिफारस केली आहे. त्यांचे संपूर्ण नांव, पूर्ण पत्ता, जन्मतारीख, शैक्षणिक अर्हता (थोडक्यात त्यांचा बायोडेटा) व पासपोर्ट साईजचे दोन अलिकडील फोटो व कार्याचा आढावा प्रस्तावासोबत पाठवावेत.
- संस्थेची शिफारस असेल तर त्या संस्थेचे पूर्ण नांव, पत्ता, नोंदणी क्रमांक व तारीख सध्याच्या पदाधिका-यांची पूर्ण नावे व पदे, थोडक्यात त्या संस्थेचा परिचय, कार्यांची माहिती, गेल्या तीन वर्षाचे वार्षिक अहवाल व लेखा परीक्षकांचा अहवाल प्रस्तावाबरोबर पाठवावा.
- कार्याची ठळक वैशिष्टये, महाराष्ट्राच्या प्रगतीच्या द्दष्टीने त्याचे महत्व, त्याचा आजूबाजूच्या परिसरावर, कार्यकर्त्यांवर झालेला परिणाम व इतरत्र अनुकरणीय असा त्या कार्यातील भाग याची माहिती दयावी.
- शिफारस केलेल्या व्यक्तीला किंवा संस्थेला यापूर्वी पारितोषिके, बक्षिसे किंवा मानमान्यता मिळाली असेल तर त्याचा संपूर्ण तपशील द्यावा.
- शिफारस करणाऱ्या व्यक्ती / संस्था यांचे नाव, पत्ता, ई-मेल, टेलिफोन व संपर्कासाठी आवश्यक ती माहिती देण्यात यावी.
- इतर काही आवश्यक माहिती असल्यास, तीसुद्धा पाठवावी.